श्री.गायकवाड जयप्रकश पेत्रस , वरिष्ठ सहाय्यक
हे कार्यालयीन कामी अनाधिकृत गैरहजर असलेने
त्यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करणे बाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-१
जिल्हा परिषद आदेश जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/७२४३९६/८१८/२०२५
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केले प्रमाणे

वाचा:- १. या कार्यालयाकडील दोषारोपपत्र जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/४२२३/२८१/२०२४ अहमदनगर दिनांक १४/०२/२०२४
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव यांचेकडील पत्र जा.क्र.वशि/आस्था-१/५९२/२०२४ दिनांक ०७/०३/२०२४ समवेत श्री गायकवाड यांचा खुलासा
३. इकडील कारणे दाखवा नोटीस जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/४२२३/२०२४ अहिल्यानगर दिनांक ०४/११/२०२४
४. श्री गायकवाड जयप्रकश पेत्रस, वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कोपरगाव यांचा खुलासा दिनांक २१/०४/२०२५
५. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चा नियम ४ (२)

श्री.गायकवाड जयप्रकाश पेत्रस, वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कोपरगाव येथे कार्यरत असताना असताना माहे एप्रिल २०२३ ते माहे सप्टेंबर अखेर वेळोवेळी एकुण ७४ दिवस कार्यालयीन कामी अनाधिकृत गैरहजर होते. तसेच श्री.गायकवाड यांना आदेशित केलेले कामकाज न करणे, विनापरवानगी गैरहजर राहणे, कार्यालयात आल्यावर कार्यालयीन वेळेपुर्वी कार्यालयातुन निघुन जाणे या सारख्या बाबी नेहमीच्या झाले असल्याने श्री.गायकवाड यांच्या वर्तनात कोणतीही सुधारण होत नसल्याने कार्यालय प्रमुखांना कार्यालयातील इतर कर्मचाऱ्यांकडुन कामकाज करुन घ्यावे लागत होते. श्री गायकवाड हे जिल्हा परिषद कर्मचारी असुन सदैव निरपवाद, सचोटीने व कर्तव्य परायण असणे आवश्यक आहे. तथापि कर्तव्याचे पालन न करुन गैरवर्तन केल्याने श्री गायकवाड यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (वर्तणुक) नियम १९६७ चे नियम ३ चा भंग केलेने संदर्भ क्रमांक १ अन्वये दोषारोपपत्र १ ते ४ बजावणेत आलेले होते.

संदर्भ क्रमांक २ नुसार श्री गायकवाड यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव यांचेमार्फत सादर केलेला आहे. सदर खुलाशाचे अवलोकन केले असता श्री.गायकवाड यांनी त्यांचेवर ठेवणेत आलेले आरोप मान्य केलेने त्यांचेवर ठेवणेत आलेल्या दोषारोपपत्रातील बाबी श्री.गायकवाड यांना मान्य असलेचे सिध्द होते. त्यानुसार संदर्भ क्रमांक ३ नुसार श्री.गायकवाड यांना कारणे दाखवा नोटीस बजावणेत येऊन श्री. गायकवाड यांनी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ मधील नियम ३ चा भंग केल्याने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (२) नुसार, श्री. गायकवाड यांची पुढील वेतनवाढ कायमस्वरुपी परिणाम होईल अशारितीने दोन वर्षाकरीता थोपविणे ही शिक्षा का करणेत येऊ नये? या बाबत खुलासा सादर करणे बाबत श्री. गायकवाड यांना कळविणेत आले.

श्री.गायकवाड जयप्रकाश पेत्रस, वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कोपरगाव, यांनी संदर्भ क्रमांक ४ नुसार खुलासा सादर केलेला आहे. श्री. गायकवाड यांचा खुलासा अंशत: मान्य करणेत येऊन कारणे दाखवा नोटीशीमध्ये नमुद केलेल्या शिक्षेऐवजी महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ४ (२) नुसार, श्री. गायकवाड जयप्रकाश पेत्रस, वरिष्ठ सहाय्यक यांची पुढील वेतनवाढ भविष्यकालीन वेतनवेतनवाढीवर कायमस्वरुपी परिणाम होईल अशारितीने एक वर्षाकरीता थोपविणे ही शिक्षा या आदेशाव्दारे अंतिम करण्यात येत आहे.

..२

सदर आदेशाची नोंद श्री.गायकवाड जयप्रकाश पेत्रस, वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कोपरगाव यांच्या मुळ सेवापुस्तकात घेणेत यावी.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषद www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक 202508060401136 असा आहे.

Signed by
Anand Subhashlal Bhandari
Date: 06-08-2025 21:04:02

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

श्री.गायकवाड जयप्रकाश पेत्रस, वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कोपरगाव
द्वारा:- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव

प्रत:- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कोपरगाव

२/- सदरचा आदेश श्री.गायकवाड जयप्रकाश पेत्रस, वरिष्ठ सहाय्यक, पंचायत समिती कोपरगाव यांना बजावून दुस-या प्रतीवर त्यांची स्वाक्षरी घेवून या कार्यालयास सादर करावी व सदर आदेशाची नोंद संबधितांच्या मुळ सेवापुस्तकात घेण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा.

**प्रत:- निवड नस्ती**

स्वाक्षरी/---
(आनंद भंडारी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर